**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ला.प्र.वि.कार्यालय,नंदुरबार
दिनांक १७/०५/२०२३.

## —: प्रेस नोट :—

आरोपी खाजगी इसम १) वसीम बशिर पिंजारी, व्यवसाय—खाजगी लेखनीक, रा. देसाईपुरा, अमर टॉकीजजवळ नंदुरबार जि. नंदुरबार २) आरोपी खाजगी इसम श्री. विशाल शिशुपाल घुगे, व्यवसाय खाजगी संगणक ऑपरेटर पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, नंदुरबार रा. ठाणेपाडा ता.जि.नंदुरबार यांना १०००/—रुपये लाचेची मागणी करुन ती रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत...

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७अ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी १) खाजगी इसम वसीम बशिर पिंजारी वय—२६ वर्षे, व्यवसाय— खाजगी वेंडर काम, रा. देसाईपुरा, अमर टॉकीजजवळ नंदुरबार जि.नंदुरबार व ऑन लाईन आधार कार्ड नोंदणी करणारे आरोपी क्र. २) श्री. विशाल शिशुपाल घुगे वय—३२ वर्षे व्यवसाय खाजगी संगणक ऑपरेटर पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, नंदुरबार रा. ठाणेपाडा ता.जि.नंदुरबार |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यांतील तक्रारदार यांनी दि. ११/११/२०२२ रोजी नविन रेशन कार्ड बनविण्याकरीता तहसिल कार्यालय,नंदुरबार येथे अर्ज व कागदपत्र बनविली होती. यावेळी खाजगी इसम वसीम बशिर पिंजारी याने तक्रारदार यांना माझे तहसिल कार्यालयात ओळख असुन मी रेशन कार्ड बनवुन देईल असे सांगितले होते. याबाबत वेळोवेळी तक्रारदार यांनी रेशन कार्ड साठी वसीम पिंजारी व तहसिल कार्यालय नंदुरबार येथे पाठपुरावा केला. परंतु तक्रारदार यास रेशन कार्ड मिळाले नाही. दिनांक ०९/०५/२०२३ रोजी वरील नमूद खाजगी इसम यांनी तक्रारदारकडे रेशन कार्ड बनवुन देण्यासाठी पुन्हा १०००/—रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर दि. १६/०५/२०२३ रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे तक्रार दिल्यानंतर दि. १६/०५/२०२३ व दि. १७/०५/२०२३ रोजी पंचांसमक्ष केलेल्या पडताळणीत आरोपी वसीम पिंजारी यांनी स्वत:साठी ७०० रू. व संगणक ऑपरेटर विशाल घुगे यांचेसाठी ३००रू .अशी एकूण १०००/—रू.ची मागणी केली तसेच संगणक ऑपरेटर विशाल घुगे यांनेसध्दा रेशन कार्ड साठीची फी वसीम पिंजारी यांच्याकडे देण्यास तक्रारदार यांना सांगितले.<br>त्यानंतर आज दिनांक १७/०५/२०२३ रोजी खाजगी इसम क्र.१ यास तहसिल कार्यालय,नंदुरबार येथील आवारात पंच साक्षीदारासमक्ष १०००/रू. लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरील नमूद दोन्ही आरोपी इसमांचे विरूध्दात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| कामगिरी पथक | सदर कामगिरी पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश आनंदराव चौधरी सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती माधवी एस. वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/मनोज अहिरे, पोना/अमोल मराठे, पोना/देवराम गावीत, पोना/संदीप नावाडेकर, चापोना/जितेंद्र महाले व मपोना/ज्योती पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नंदुरबार जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.


संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय, नंदुरबार
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२३०००९

(माधवी एस.वाघ)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार


Scanned with CamScanner